- बारीक तुकडे केलेला चारा बॅग/ खड्यामध्ये भरण्यास सुरूवात करावा, हिरवा चाऱ्याचा २०-२५ सें.मी. थर देऊन तो धुमसाच्या सहाय्याने किंवा पायाने व्यवस्थित दाबावा जेणेकरून त्यामध्ये अडकलेली हवा निघून जाईल.
- खड्डा भरून घेताना चारा कुट्टीमध्ये बाजारात उपलब्ध मुरघासाचे नामवंत कंपनीचे कल्चर पावडर टाकल्यास मुरघास लवकर बनते व चांगले मुरघास बनविण्यास मदत होते.
- शेवटी मूरघासाने भरल्यावर खड्डा काळजीपूर्वक झाकुन घ्यावा /बॅग पूर्णपणे हवाबंद करावी.
- मूरघास ६ आठवड्यात तयार होतो व असा मूरघास १ वर्षापर्यंत साठवून राहू शकतो.

उत्तम प्रतीच्या मूरघासाचे गुणधर्म / वैशिष्टये

उत्तम प्रतीच्या मूरघासाचे गुणधर्म खालीलप्रमाणे असतात.

- मूरघासाचा रंग हा हिरवट-पिवळसर असा असतो.
- अशा प्रतीचा मूरघास अत्यंत चविष्ट असतो.
- बुरशी विरहीत असतो.
- यास एक वैशिष्ट्यपूर्ण असा सुवास असतो.
- मूरघासाचे पोषणमूल्य हिरव्या चाऱ्याच्या इतके असते.

मूरघास तयार करण्याचे फायदे

- पावसाळ्यात मुबलक प्रमाणात उपलब्ध असणारा हिरवा चारा व इतर चाऱ्याचे आपण या पध्दतीने संवर्धन करून, चांगल्या प्रतीचा चारा जनावरांसाठी वर्षभर उपलब्ध करू शकतो.
- हिरवा चाऱ्याचा होणारा अपव्यय टाळू शकतो.
- जनावरास मूरघास दिल्यामुळे पशुंपासून मिळणाऱ्या उत्पन्नात वाढ होते व त्यांचे आरोग्य चांगले राहते.
- मूरघास सुवासिक व चविष्ट असल्यामुळे जनावरे यास आवडीने खातात.

- एकदा तयार झाल्यावर मूरघास हा वर्षभर उत्तम स्थितीत राहू शकतो.
- पावसाळ्यात उपलब्ध होणाऱ्या अतिरिक्त हिरव्या चाऱ्याचे आपण या पध्दतीने योग्य व्यवस्थापन करू शकतो.

गायी म्हशींच्या आहारात याचा समावेश करताना हळूहळू करावा, दुधाळ पशूंना दूध काढल्यानंतर मुरघास खाण्यास द्यावा जेणेकरून दुधास मुरघासाचा वास लागणार नाही.

अशाप्रकारे हिरवा चारा जेव्हा मुबलक प्रमाणात उपलब्ध असतो तेव्हा त्याचे 'मूरघास' च्या रूपाने संवर्धन करून आपण जनावरास हिरवा चारा वर्षभरासाठी किंवा टंचाईच्या काळासाठी साठवण करावा जेणेकरून पशुधनापासून अपेक्षित उत्पादन मिळेल. मुरघास बनवितांना आवश्यकतेनूसार पशुवैद्यक किंवा पशुआहार तज्ञांचा सल्ला घ्यावा.





संकलन
डॉ. विठ्ठल मुंडे आणि डॉ. सुनीत वानखेडे
पशुवैद्यक व पशुविज्ञान महाविद्यालय
परभणी

मपमविवि/वि.शि.सं./प्रकाशने/२४/२०२३



मुरघासः पशूंसाठी हिरव्या चाऱ्याचे संवर्धन

प्रकाशक
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ
फुटाळा तलाव मार्ग, नागपूर - ४४०००१
टोल फ्री क्रमांक - १८००-२३३-३२६८
संकेतस्थळ - www.mafsu.in

शेतकरी बंधूनो आपल्याकडे पशुंसाठी हिरव्या चाऱ्याची कमतरता नेहमी असते, तर उन्हाळ्यात त्याचे दुर्भिक्ष अधिक जाणवते. सिंचनाची सोय असलेल्या शेतकऱ्याकडेच उन्हाळ्यात हिरवा चारा उपलब्ध असतो, महाराष्ट्रात अशा शेतकऱ्यांची प्रमाण कमी असल्याने हिरवा चारा पिकांचे उत्पादन प्रमाण अत्यंत अल्प आहे. अशा परिस्थितीत हिरव्या चाऱ्याचा सतत पुरवठा होण्यासाठी, उपलब्ध हिरव्या चाऱ्याचे योग्य पध्दतीने संवर्धन केले पाहिजे. चारा संवर्धनाच्या पध्दतीमध्ये हिरव्या चाऱ्यापासून 'मूरघास' तयार करणे ही एक अतिशय चांगली व लाभदायी पध्दत आहे.

महाराष्ट्रात पावसाळ्यात व काही प्रमाणात हिवाळ्यात शेतकऱ्याने जर हिरव्या चाऱ्याचे मूरघास पध्दतीने संवर्धन केले तर पशुधनास वर्षभर मुबलक प्रमाणात पौष्टीक खाद्य पुरविले जाऊ शकते.

मूरघासः मूरघास हे उत्कृष्ट व चविष्ट असे पशुखाद्य आहे जे हिरव्या चाऱ्यापासून नियंत्रीत आंबवन प्रक्रियेने तयार केले जाते.

मूरघास बनविण्यासाठी योग्य पिके

मूरघास बनविण्यासाठी मका, ज्वारी यासारखे जाडसर बुंधा असणारे व साखरेचे प्रमाण अधिक असणारे चारापिके योग्य असतात. याशिवाय इतर काही पिकांची सुध्दा मुरघास बनविण्यासाठी निवड करता येते मात्र ते करतांना पशुवैद्यकाच्या सल्ल्याने मूरघास बनविण्याच्या प्रक्रियेत किरकोळ बदल करणे आवश्यक ठरते.

उदा. १) मका
२) ज्वारी
३) बाजरी
४) हिरवे गवत (गजराज, डी. एच. एन.- ६)
५) ऊसाचे वाडे इत्यादी

मूरघासाची साठवण

मूरघास तयार करण्यासाठी 'मूरघास खड्डा' किंवा मूरघास बॅगची गरज भासते. खड्डा बनवितांना काही महत्वाच्या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

अ) मूरघास खड्डा : सिमेंट काँक्रीटने तयार केलेल्या मूरघास खड्याच्या भिंती या हवाबंद असाव्यात, भिंतीमध्ये कोणत्याही प्रकारची भेग असू नये कारण अशा भेगेतून हवा आतमध्ये जाते व त्यामुळे बुरशीची वाढ होऊ शकते. जर मूरघास खड्डा हा जमिनीखाली असेल तर अशा भेगेतून पाणी आतमध्ये जाण्याची शक्यता असते व त्यामुळे मूरघास सडण्याची शक्यता असते.

भिंतीः मूरघास खड्याच्या भिंती मऊ, गोलाकार असाव्यात, भिंतीला कोपरे किंवा कोनाडे असू नयेत.

मूरघास खड्ड्याची खोली व उंची : जर मूरघास खड्डा हा जमिनीखाली असेल तर त्याची खोली ही जमिनीच्या पाण्याच्या पातळीवर अवलंबून असते, अशा खड्याची खोली ही जमिनीच्या पाण्याच्या पातळीच्या वर असावी. त्याचप्रमाणे मूरघास खड्डा हा जमिनीवर असेल तर खड्याची उंची ही खड्डा भरण्याच्या पध्दतीवर अवलंबून असते.



ब) मुरघास बॅगः अलीकडच्या काळात पॉलिथिन पिशव्यांमध्ये सायलेज बनविण्याचे तंत्रज्ञान सुध्दा विकसित झाले आहे. शेतातील इतर कामांसोबत कमी प्रमाणात सायलेज बनवू इच्छिणाऱ्या अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी मूरघास बॅग सोयीस्कर आहे. मुरघास तयार करायच्या पिशव्या सावलीत ठेवाव्यात. सध्या बाजारामध्ये एक क्विंटल, एक टन तसेच पाच टन क्षमतेच्या मुरघास तयार करण्यासाठीच्या पिशव्या उपलब्ध आहेत.



मुरघास तयार करण्याची पध्दत

- मूरघास बनवण्यासाठी जी चारा पिके आपल्याकडे उपलब्ध असतील, अशा चारा पिकांची कापणी चारा पिके फुलोऱ्यात असतांना करावी.
- मक्यापासून मुरघास तयार करताना मक्याच्या कणसाच्या दाण्यात दूध भरण्याच्या अवस्थेत मक्याच्या पिकाची कापणी करावी. अशा मक्यापासून उत्तम प्रतीचा मुरघास तयार होतो.
- अशा कापलेल्या चाऱ्याची कडबाकुट्टी यंत्राच्या सहाय्याने कुट्टी (३-४ सें. मी. लांबीचे तुकडे) करून घ्यावी.
- कुट्टी केलेल्या चाऱ्यात पाण्याचे/आद्रतेचे प्रमाण ६० ते ६५ टक्के असावे.